**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प (जागतिक बॅंक अर्थसहाय्यित)**

**मोठे जनावरे बाजार/लहान जनावरे बाजार आधुनिकीकरण अंतर्गत प्रकल्प अनुदान वितरण संबंधित महत्वाच्या अंमलबजावणी सुचना**

**(मूळ इंग्रजी तर्जुमा अधिकृत आहे)**

मोठे जनावरे बाजार/लहान जनावरे बाजार आधुनिकीकरण करण्यासाठी १००% प्रकल्प अनुदान, बाजार समितीने बांधकाम कार्यादेश दिल्यानंतर आणि झालेल्या बांधकामाची सर्व देयके कंत्राटदारास बाजार समितीने अदा केल्यानंतर बाजार समितीस दिले जाईल. प्रकल्प अनुदान बाजार समितीस प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) यांचे मार्फत बाजार समितीस खालील पध्दतीने वितरीत करण्यात येईल. (प्रकल्पासोबत केलेल्या कराराच्या आधारावर व कामाच्या प्रगतीस अनुसरून)

**अ) मोठे जनावरे बाजार/लहान जनावरे बाजार आधुनिकीकरणासाठी टप्प्या टप्प्याने वितरीत होणा-या प्रकल्प अनुदान संबंधित मार्गदर्शक सूचना**

टिप- मोठे जनावरे बाजार/लहान जनावरे बाजार हे बाजार समितीचे मुख्य अथवा उपबाजार असून आणि त्या बाजारावर बाजार समितीचे प्रशासकीय नियंत्रण असते.

| अ. क्र. | टप्पे | संबंधित एजन्सी | प्रकल्प अनुदानाची टक्केवारी | कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १ | संपुर्ण प्रकल्प अहवाल (FPP) मंजूरी | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) | - | संपुर्ण प्रकल्प अहवाल (FPP) मंजूरी पत्र |
| २ | जाहिरात निविदा प्रसिध्दी आणि निविदा विक्री | कृषि उत्पन्न बाजार समिती (LSM/SRM) | - | जाहिरात निविदा नोटीस |
| ३ | बिड पडताळणी अहवाल तयार करणे | कृषि उत्पन्न बाजार समिती (LSM/SRM) | - | बिड पडताळणी अहवाल |
| ४ | बिड पडताळणी अहवालास मंजूरी देणे | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) | - | बिड पडताळणी अहवाल मंजूरी पत्र |
| ५ | कार्यादेश देणे | कृषि उत्पन्न बाजार समिती (LSM/SRM) | - | कार्यादेश |
| ६ | प्रथम अनुदान हप्ता | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) | एकुण बांधकाम मुल्याच्या २५% | कार्यादेश |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | दुसरा अनुदान हप्ता | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) | एकुण बांधकाम मुल्याच्या ३०% | १) एकुण २०% बांधकाम पुर्ण झाल्यानंतर आणि कंत्राटदारास बाजार समितीने देयके अदा केल्यानंतर तसेच बाजार क्षेत्र अभियंता (MFE) यांचे उपयोगिता प्रमाणपत्र<br>२) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) च्या पथकाचा स्थळ तपासणी अहवाल |
| ८ | तिसरा अनुदान हप्ता | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) | एकुण बांधकाम मुल्याच्या ३०% | १) एकुण ५०% बांधकाम पुर्ण झाल्यानंतर आणि कंत्राटदारास बाजार समितीने देयके अदा केल्यानंतर तसेच बाजार क्षेत्र अभियंता (MFE) यांचे उपयोगिता प्रमाणपत्र<br>२) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) च्या पथकाचा स्थळ तपासणी अहवाल |
| ८ | चौथा आणि अंतिम अनुदान हप्ता | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) | एकुण बांधकाम मुल्याच्या १५% (शिल्लक अनुदान) | १) एकुण १००% बांधकाम पुर्ण झाल्यानंतर आणि कंत्राटदारास बाजार समितीने देयके अदा केल्यानंतर तसेच बाजार क्षेत्र अभियंता (MFE) यांचे उपयोगिता प्रमाणपत्र<br>२) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) च्या पथकाचा स्थळ तपासणी अहवाल |

**ब) प्रकल्प अनुदानासाठी कागद पत्रे सादर करणे आणि त्यांची पडताळणी:-**

१) मोठे जनावरे बाजार/लहान जनावरे बाजार आधुनिकीकरण करण्यासाठी निवड झालेली बाजार समिती ही प्रकल्प अनुदान चार टप्प्यामध्ये घेण्यास पात्र राहील. तसेच वरील तक्त्याप्रमाणे नमुद केल्यानुसार

बांधकामाच्या प्रगतीनुसार तसेच संपुर्ण प्रकल्प अहवाल (FPP) मंजूरी आदेश मध्ये नमुद केलेल्या अटी शर्तीच्या आधारे बाजार समिती प्रकल्प अनुदानास पात्र राहील.

२) **संपादन आणि अंमलबजावणी सुचना:-** बाजार समितीने नेमावयाचे कंत्राटदार आणि सेवापुरवठादार बांधकामाच्या देखरेखीसाठी आर्किटेक्ट हे MACP प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करुनच नेमणे अपेक्षित आहे. अन्यथा बाजार समिती अनुदानासाठी अपात्र ठरण्याची शक्यता आहे. प्रकल्पाने विहित केलेल्या गुणवत्ता राखण्याविषयक मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यास कसुर केली आहे असे निदर्शनास आल्यास संबंधित बाजार समिती अनुदान मिळण्यास पात्र राहणार नाही.

३) **बांधकामच्या दर्जा संबंधित प्रकल्प कार्यालायाचे पडताळणी पत्रक (Checklist):-** जी बाजार समिती प्रचलित पध्दतीनुसार तसेच बांधकामाच्या उत्कृष्ठ दर्जा आवश्यक त्या पडताळणी पत्रकानुसार (Checklist) काम करीत नाही ती बाजार समिती प्रकल्प अनुदानासाठी पात्र राहणार नाही.

४) बाजार समिती सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे प्रकल्प अनुदानासाठी अर्ज सादर करू शकते. नियोजित कामाचे टप्पे पुर्ण झाल्यानंतर खाली नमुद केलेल्या कागदपत्रे मा. सभापती आणि सचिव यांनी साक्षांकित करून या कार्यालयास सादर करावी.

- बाजार समितीच्या ठरावाची प्रत
- कंत्राटदारांच्या कार्यदेशाचे प्रत
- एम बी रेकॉर्डची प्रत
- बांधकाम संबंधित छायाचित्रे
- पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन संबंधित पूर्तता प्रमाणपत्राची प्रत.
- मुदतवाढ आदेशाचे (असल्यास) प्रत
- यापूर्वी अदायगी केलेल्या RA बिलाचा तपशील
- कमी जादा कामाचे ( Excess-Saving Statement) तपशील,
- फरकाचे ( Variation Sttatement) तपशील.

५) प्रकल्प अनुदान हे बाजार समितीस प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) च्या मंजूरीनंतर जास्तीस जास्त ४ टप्प्यामध्ये अदा करण्यात येईल.

६) **कामाची पाहणी:-** बाजार समितीने अनुदान मागणी केल्यानंतर प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) ची पाहणी पथक स्थळ भेट देईल. क्षेत्रभेटीव्दारे उपरोक्त अर्जामध्ये सादर केलेल्या तपशीलाची पडताळणी करण्यात येईल आणि योग्यतेबाबत शिफारस करण्यात येईल. प्रकल्पामार्फत सदर तपासणी पथकामध्ये

समावीष्ठ अधिकारी - १) सिव्हील इंजिनिअर स्पेशालिस्ट, PIU-AM, २) प्रभारी अधिकारी (बाजार समिती), PIU-AM, ३) तांत्रिक अधिकारी, PIU-AM, ४) पर्यावरण सामाजिक विशेषज्ञ, PIU-AM, ५) लेखाधिकारी, PIU-AM.

७) **<u>प्रथम अनुदान हप्ताः-</u>** बाजार समितीने अंतिम निवडलेल्या कंत्राटदारास बांधकाम आदेश दिल्यानंतर प्रथम अनुदान हप्त्यास पात्र असेल. प्रथम अनुदान हप्ता हा जास्तीस जास्त एकुण बांधकाम मुल्याच्या २५% असेल.

८) **<u>दुसरा अनुदान हप्ताः-</u>** बाजार समिती एकुण प्रकल्पाच्या २०% काम पुर्ण झाल्यानंतर तसेच कंत्राटदाराचे दयके अदा केल्यानंतर दुस-या अनुदान हप्त्यास पात्र असेल. दुसरा अनुदान हप्ता हा एकुण बांधकाम मुल्याच्या ३०% असेल.

९) **<u>तिसरा अनुदान हप्ताः-</u>** बाजार समिती एकुण प्रकल्पाच्या ५०% काम पुर्ण झाल्यानंतर तसेच कंत्राटदाराचे दयके अदा केल्यानंतर तिस-या अनुदान हप्त्यास पात्र असेल. तिसरा अनुदान हप्ता हा एकुण बांधकाम मुल्याच्या ३०% असेल.

१०) **<u>चौथा व अंतिम अनुदान हप्ताः-</u>** बाजार समिती एकुण १००% काम पुर्ण झाल्यानंतर तसेच कंत्राटदाराचे दयके अदा केल्यानंतर चौथ्या अनुदान हप्त्यास पात्र असेल. चौथा अनुदान हप्ता हा एकुण बांधकाम मुल्याच्या १५% असेल.

११) प्रकल्प अनुदान प्राप्त करून घेणेसाठी बाजार समितीने स्वतंत्र बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडावे. या खात्यामध्ये प्रकल्प अनुदानाची रक्कम टप्प्या टप्प्याने वर्ग करण्यात येईल. या संपूर्ण कामाचे स्वतंत्र Audit Books ठेवण्यात यावीत आणि लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी बाजार समितीची आहे.

१२) **<u>लेखा परीक्षणः-</u>** प्रकल्पाअंतर्गत घेतलेल्या विकास कामांचे संदर्भातील सर्व हिशेब बाजार समितीने काळजीपूर्वक ठेऊन प्रकल्पाच्या अधिका-यांना वेळोवेळी सादर करावेत. दुस-या आणि तिस-या टप्प्याचे अनुदान वितरीत करण्यापुर्वी बाजार समितीने संपूर्ण कामाची देयके अदा केलेली आहेत याची व कंत्राटदाराने बांधकाम गुणवत्तेबाबत तांत्रिक सुयोग्यतेचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेतलेले आहे याची पडताळणी करण्यात येईल. तसेच प्रत्येक अनुदान हप्ता वितरीत करण्यापुर्वी बाजार समितीच्या प्रकल्पासंबंधित दप्तराचे प्रकल्पाने नेमलेल्या लेखापरिक्षकांमार्फत लेखापरिक्षण झाल्याबाबतची खातरजमा करून घेण्यात येणार आहे. लेखापरिक्षण प्रकल्प खर्चा संबंधी आवश्यक दप्तरांचे लेखापरिक्षण प्रकल्पाचे अंतर्गत लेखा परिक्षक (Internal Auditor) आणि बाह्य लेखापरिक्षक (External Auditor) यांच्या मार्फत नियमितपणे करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

# जोडपत्र - कृषि उत्पन्न बाजार समितीने अनुदानासाठी प्रकल्पाकडे करावयाच्या अर्जाचा नमूना -

*( बाजार समितीच्या लेटर हेड वर )*

प्रति,
नोडल ऑफिसर,
प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन)
महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे 411037.

**विषय** - प्रकल्पांतर्गत घेतलेल्या विकास कामांसाठी अनुदान मिळण्याबाबत अर्ज -

प्रथम / द्वितीय / तृतीय / चौथा व अंतिम अनुदान हप्ता (*कृ. लागू नसेल ते खोडावे*)

**संदर्भ** - विस्तृत प्रकल्प अहवाल (FPP) मंजूरी आदेश क्र. ----------------, दि. ----------.

महोदय,

वरील विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, ---------------- कृषि उत्पन्न बाजार समिती, --------, ता. --------, जि. --------- यांना वरील संदर्भानुसार मंजूर करण्यात आलेल्या विस्तृत प्रकल्प अहवाल (FPP) संबंधित बांधकामे 20% / 50% / 100% (*कृ. लागू नसेल ते खोडावे*) पूर्ण करण्यात आलेली आहेत. त्यानुसार उपरोक्त बाजार समिती प्रथम / द्वितीय / तृतीय / चौथा व अंतिम अनुदान हप्ता (*कृ. लागू नसेल ते खोडावे*) साठी पात्र असून, या पत्राद्वारे प्रकल्पाकडे अनुदान विनंती-अर्ज खालील कागदपत्रांसह सादर करण्यात येत आहे. तरी कृपया मंजूरी मिळावी.

1. विस्तृत प्रकल्प अहवाल (FPP) संबंधित बांधकामे 20% /50% / 100% (*कृ. लागू नसेल ते खोडावे*) पूर्ण करण्यात आलेली आहेत या संबंधीचे प्रमाणपत्र व ठराव (प्रत).
2. कंत्राटदारांना देण्यात आलेले कार्यादेश (प्रत).
3. मोजमाप रेकॉर्ड (MB Record) (प्रत).
4. बांधकाम संबंधित छायाचित्रे (प्रत).
5. पर्यावरण - सामाजिक व्यवस्थापन उपाययोजनांबाबत पूर्तता अहवाल (प्रत).
6. मुदतवाढ आदेश (लागू असल्यास) (प्रत).
7. अदा करण्यात आलेली धावती देयके (RA Bills) (प्रत).
8. जादा कामे - बचत (excess-saving) संबंधित विवरणपत्र (प्रत).
9. अतिरिक्त बाबींचे (variations) तपशील (कारणांसह) (प्रत).

आपला विश्वासू,

**अध्यक्ष** **सचिव**

--------- कृषि उत्पन्न बाजार समिती, --------,
ता. --------, जि. ---------

प्रथम / द्वितीय / ______ / ______ अनुदान हप्ता वितरण संबंधित पडताळणी पत्रक (Checklist)

(अनुदान प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे) -

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | बाजार समिती नांव व पत्ता | | |
| 2 | बाजार आवाराचे नांव व पत्ता | | |
| 3 | कामाचे नांव व वर्णन | | |
| 4 | बाजार समितीचा मास्टर प्लॅन नुसार आराखडा तयार केलेला आहे कांय? (होय / नाही). नसल्यास, कोणते बदल समाविष्ठ केलेले आहेत? | होय | नाही |
| 4 (अ) | वरील बाबत कारण मिमांसा द्यावी. | | |
| 5 | मंजूर बिड मूल्य (रु. लाख) | | |
| 6. | कंत्राटदारांचे नांव व पत्ता | | |
| 7. | कामे प्रारंभ केल्याचा दिनांक | | |
| 8 | कार्यादेशानुसार कामाची मुदत | | |
| 9 | खर्च (अद्ययावत) (रक्कम रुपये) | धावते देयक **R.A. Bill No 1.-** रु.<br>धावते देयक **R.A. Bill No 2.-** रु.<br>धावते देयक **R.A. Bill No 3.-** रु.<br>धावते देयक **R.A. Bill No 4.-** रु.<br>______________<br>एकूण रक्कम –रु. . | |
| 10 | मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमार्फत (PWD Lab or Engineering College) बांधकाम साहित्यांचे परिक्षण करून त्यांचे परिक्षण अहवाल प्राप्त करून घेतलेले आहेत कांय? (होय / नाही). | होय | नाही |
| 11 | बांधकाम साहित्यांचे परिक्षण अहवाल निकषांनुसार स्वीकृत करण्यास पात्र आहेत कांय?<br>कृ. बांधकाम साहित्यांचे परिक्षण यादी दर्शवावी -<br>1) काँक्रीट ब्लॉक -------<br>2) रि-इन्फोर्समेंट (Reinforcement) ----- | | |
| 12 | अतिरिक्त बाबींचा तपशील द्यावा. यास रचनाकार (Architect) यांनी मान्यता देलेली आहे कांय? अतिरिक्त बाबींविषयी कारण मिमांसा दर्शवावी. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | प्रमाण (quantities) मध्ये अतिरिक्त बाबी तपशील द्यावा. अतिरिक्त बाबींविषयी कारण मिमांसा दर्शवावी. | | |
| 14 | बांधकामांविषयी प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत तपशील सादर करावा. | | |
| 15 | बांधकाम मोजमाप नोंदवह्या (MB Record Books) योग्य रित्या नोंदविल्या असल्याबाबतचे स्पष्ट अभिप्राय नमूद करावेत. | | |
| 16 | उभारलेल्या वास्तुंची मोजमापे मंजूर आराखड्याप्रमाणे (FPP) असल्याबाबतचे स्पष्ट अभिप्राय नमूद करावेत. | | |
| 17 | जादा कामे - बचत (excess-saving) संबंधित तपशील नमूद करावेत. | | |
| 18 | बांधकाम मोजमाप नोंदवह्या (MB Record Books) पडताळणी (Measurements Check) | | |

## प्रपत्र -अ

## - आर्किटेक्ट यांचा दाखला -

प्रमाणित करण्यात येते की कृषि उत्पन्न बाजार समिती, ---------------- जि. ------------- यांचे मुख्य बाजार आवार, उपबाजार, -------------- मधील ----------- महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाअंतर्गत चालु असलेले बांधकाम माझ्या देखरेखखाली चालु असुन सदरचे काम सक्षम अधिका-याने मंजुर केलेल्या प्लॅन व एस्टिमेट तसेच स्पेसिफिकेशननुसारच चालु आहे. आतापर्यंत झालेले बांधकाम हे उत्कृष्ठ दर्जाचे बांधकाम साहित्य मजुर व मंजुर निविदेमधील सर्वसाधारण व सविस्तर स्पेसिफिकेशननुसारच समाधानपुर्वक झालेले आहे. झालेले बांधकाम हे स्ट्रक्चरलदृष्ट्या पक्के व सुरक्षित आहे. तसेच बांधकामावरील आतापर्यंत झालेले सर्व खर्च हा मंजुर एस्टिमेट व झालेल्या बांधकामाच्या मोजमापानुसारच झालेला आहे.

आर्किटेक्ट ----------------------------------

कृषि उत्पन्न बाजार समिती, -------------

जि. -----------

---

## <u>Annexure - A</u>

### Certificate of Architect

This is to certify that the construction work of Agriculture Produce Market Committee, Dist - under Maharashtra Agricultural Competitiveness Project is executed under my Supervision. The work executed is as per sanction plan, standard specifications and is in compliance with the quality norms of the IS specifications. The material used for construction work is as per IS specifications. The payments made is as per approved Schedule B rates.

Architect ------------------------------------

Agriculture Produce Market Committee --------------------

Dist --------------------------

Annexure "B"

Statement showing the excess & saving Amount

| Sr. No. | Description | Quantity as per Sanctioned Tender | Executed Quantity | Rate | Amount as per sanction Tender | Amount as per work done | Excess | Saving | Reason of Excess & Saving |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6= (3x5) | 7=(4x5) | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |
| Total | | | | | | | | | |

Architect Secretary Chairman

Agriculture Produce Market Committee --------------------

Tal. --------------------, Dist. ----------------------